REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# दिव्यांगाची सामाजिक व आर्थिक सुरक्षितता

डॉ. संगीता आ. जवंजाळ
सहयोगी प्राध्यापक, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जी जि अमरावती.

## प्रस्तावना :



'अठरा वर्षाखालील बालकाला मुल असे संबोधतात'. आणि सर्व सामान्य मुलांना स्वतंत्र व्यक्तीत्व, विचारशक्ती असल्याचे बाल मानसशास्त्र मान्य करते. जगण्याची उत्तम संधी, प्रेमळ संगोपन, घर आणि कुटुंबात एकत्रितपणे राहणे बालकाचे मुलभुत अधिकार आहे. तद्वतच योग्य शिक्षण, सकस आहार,उत्तम आरोग्य, सुरक्षितता इत्यादी बालकांचे जन्मसिध्द हक्क आहे. मुले राष्ट्राची अनमोल संपत्ती असल्याचे आंतरराष्ट्रीय मानव हक्क संघटना मान्य करते. या मानवीय संपत्तीचे योग्य संगोपण होण्यासाठी त्यांची विशेष काळजी घेणे, त्यांना सुरक्षितता प्रदान करणे महत्वाचे ठरते. या अनुशंगाने बालकांच्या मुलभुत अधिकार व हक्कासंबंधी जागतिक आरोग्य संघटनेच्या 1959 साली आयोजित केल्या गेलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रथमतः संहिता तयार करण्यात आली,

सामाजिक संरचनेच्या दृष्टीकोनातुन विचार करू जाता लक्षात येते की, सुरक्षित सुसपंन्न, प्रसन्न कौटुबिक वातावरणात संगोपित होणा—या मुलांना सुरक्षितता लाभते .जीवनामध्ये विकास साधण्याच्या संधी सहजगत्या प्राप्त होतात. उलटपक्षी द्रारिद्रय अज्ञान अंधश्रद्वा परंपरागत कुप्रथा अनावश्यक व वाईट चालिरीतीच्या दृष्टचक्रात अडकलेल्या संभ्रमित पालकांच्या दुर्दैवी मुलांचे तसेच नैसर्गिक आणि मानवनिर्मिती आपत्तीमुळे दिव्यांग आलेल्या मुलांचे भवितव्य अंधकारमय दिसते त्यांचे प्रश्न ज्वलंत व कठीण आहेत अशा प्रश्नाकडे वळण्यापुर्वी दिव्यांगता समजुन घेणे महत्वाचे आहे

## दिव्यांगत्वाची परिभाषा :

वैद्यकीय दृष्टीकोनातुन शारिरीक दृष्टया 40 % अकार्यक्षमता असल्याचा दाखला अधिकृत वैद्यकीय अधिका—यांने दिल्यास त्या मुलाला दिव्यांग ठरविल्या जाते.

## दिव्यांगत्वाचे वर्गीकरण :—

अंधत्व, कर्णबधिरत्व, शारीरिक अकार्यक्षमत्व,शारीरिक अपंगत्व, मतिमंदत्व, कुष्ठत्व आणि मानसिक आजार असे वर्गीकरण केले जाते.

## दिव्यांगत्व येण्याची कारणेः

दिव्यांग हि समस्या सिमीत कक्षेपुरती मर्यादित नसुन जगव्यापी समस्या आहे. या जागतिक समस्येची कारणमिमांसा जाणुन घेणे अतिशय जिकरीचे काम आहे. दिव्यांग येण्यासाठी कारणीभुत ठरवणा—या संभाव्य आणि ज्ञात कोणत्याही एका कारणाकडे आपण ठामपणे अंगुली निर्देश करू शकत नाही अज्ञान, दारिद्रय,योग्य औषधोपचाराचा अभाव, अंधश्रद्वा, संसर्गजन्य आजार,अनुवांशिकता दुषीत वातावरण, पोषक अन्नघटकांची कमतरता,

गर्भधारणेपुर्वी किंवा गर्भावस्थेत झालेले आजार, अपघात या सारख्या एक किंवा अनेक कारणाच्या संमिश्रणामुळे दिव्यांगत्व येते असे शास्त्र मान्य करते

## दिव्यांगत्वाची स्थिती:

मानवीय सामाजरचनेमध्ये सशक्त मुलांना आशावादी दृष्टोकोनातुन पाहिले जाते. परंतु मुलांमध्ये दिव्यांगत्व असल्याचे निदान झाल्यास पालक व समाजाचा दृष्टीकोन निराशवादी होतो परंतु ते समाजाचे अभिन्न घटक असल्यामुळे दिंव्यागत्वाची स्थिती जाणुन घेणेअत्यावश्यक आहे जागतिक पातळीवर विचार केल्याास जगाच्या एकुण लोकसंख्येपैकी 10% लोकसंख्या दिव्यांग असल्याचे स्पष्ट झाले आहे. भारतामध्ये 1991 साली दिव्यांगाची संख्या व त्यांचे विविध प्रकार यासंबधी गणना करण्यासाठी नमुना सर्वेक्षणकरण्यात आले. त्यामध्ये एकुण लोकसंख्येपैकी 2% लोक अंधत्व, कर्णबधिरत्व, मुकबधीरत्व,शारीरिक दिव्यांगत्व, मतिमंदत्व, कुष्ठत्व व मानसिक आजार यासारख्या अपंगत्वाने ग्रसलेले आढळते अन्य राष्ट्रीय सर्वेक्षणामधे दिव्यांगत्वाचे प्रमाण ग्रामीण भागात दर हजारी 20 व्यक्ती आणिशहरी विभागामध्ये दरहजारी 16 असल्याचे दिसुन आले आहे. दिव्यांग मुलांचा विचार केला असता त्यांचे प्रमाणे 20% आढळले. शासकिय व इतर स्तरावर दिव्यांगासाठी कल्याणकारी योजना आखण्याचे दृष्टीने त्यांची योग्य संख्या माहिती होणे गरजेचे आहे. कारण समाजविकासासाठी समाजातील दुर्बल घटकांचा विकास होणे अत्यावश्यक असते. दुर्बल घटकामध्ये दिव्यांगाचा समावेश होते ते समाजाचे अविभाज्य घटक असल्याचे संवैधानिकरित्या मान्य करण्यात आले आहे. त्यांच्या उत्कर्षासाठी भारत सरकार कटीबंद्व असल्यामुळे 2001 सालच्या जनगणनेमध्ये 15 वा प्रश्न दिव्यागासबंधि होता दिव्यांग बालक जीवनाचा आनंद उपभोगु शकत नाही त्यांना मुक्तपणे खेळण्या बागडण्याच्या आवश्यकसंधीचा वणवा असतो सर्वागिणविकासासाठी आवश्यक असणा—या योग्य शिक्षण, प्रशिक्षण पुनर्वसन , सामाजिक समरसता या बाबीपासुन ते बरेचदा वंचित ठेवल्या जातात. पृथ्वी तलावरील 'शापित जीव' म्हणुन त्यांची अव्हेलना केली जाते विविध कारणमुळे ते दुर्लक्षित होतात.कौटुबिक व सामाजिक मानसिक यातनांना तोड देतांना ते आत्मविश्वास गमावुन बसतात दुर्दैवाने या दृष्ठकृत्यास बहुतांशी त्याचे स्वकियंच जबाबदार असतात. नियतीच्या कुरचक्रातुन दिव्यांगाना बाहेर काढुन त्यांचे जीवन आनंदमय करण्यासाठी आतंरराष्ट्रीय,राष्ट्रीय स्वंयसेवी सामाजिक व वैयक्तीक पातळीवर राबण्यिात येणा—या संवैधनिक कायदेशिर हक्क व अधिकाराची मिमांसा पुढे करू या

## अपंग अधिनियम 2016:

लोकसभेमध्ये The Right of Person with Disabilities Bill -2016 PwD Act.१९९५ च्या जागेवर पारित करण्यात आला आहे आणि त्यात 21 प्रकारच्या दिव्यांगत्वाचा समावेश करण्यात आला त्यामधे सिकलसेल,ॲसिड अटॅक पार्कीन्सस Hemophilia ,Thalassemia इत्यादीचा समावेश आहे

## दिव्यांगत्वाचे हक्क आणि सुरक्षितता:

दिव्याग मुलांना सर्वसामान्य मुलाप्रमाणेच स्वावलंबी जीवन जगण्याचा हक्क आहे सदर मुलांची श।ारिरीक सामाजिक आर्थिक स्थिती त्यांच्या विशेष गरजा या गोष्टी लक्षात घेवुन त्यांच्या पुर्ततेसाठी सर्वतोपरी सहाकार्य करणे, दिव्यांगाबद्लची आणि नुतन संशोधने यांची राष्ट्राराष्ट्रात आपसात देवाण घेवान होवुन यथायोग्य माहितीचा प्रसार करणे गरजेचे आहे. या सर्व उपायांनी विकसनशिल व विकसित राष्ट्राची विकलांगतेच्या समस्येवर प्रभावी उपाय योजना करण्याची क्षमता आणि कौशल्य वाढेल संयुक्त राष्ट्रसंघच्या 1989 साली भरलेल्या सर्वसाधारण समितीने पीरत केलेल्या 54 कलमी संहितेतीलअ 23 या कलमात वरील विचार नोंदविले आहे. दिंव्यागाच्या हक्कासंबधी संयुक्त राष्ट्र संघटना नित्य प्रयत्नशिल असुन विविध कल्याणकरी उपक्रम राबवित असते, संयुक्त राष्ट्रसंघाने 1981 साल दिव्यांग वर्ष म्हणुन तर 1983ते 1992 विकलांगाचे दशक म्हणुन साजरे करण्यात आले सार्क संघटनेने दिव्यांगाच्या प्रति समर्पित होवुन 1993 साल दिव्यागत्वाचे वर्ष घोषित केले. दिंव्यागाचे विविध प्रश्न, त्यांच्या समोरिल आव्हाने, समस्या समजुन घेवुन त्यांची सदनशील मार्गाने सोडवणुक करण्यासाठी योग्य उपाय योजना,उपक्रम आखुन त्यांची प्रभाविपणे अंमलबजावणी करणे, दिव्यांगाचे सुरक्षितपणे पुर्वसन करण्याच्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्टा करणे या सारख्या उद्देशाची पुर्ती करून दिव्यांगाना आदर्श जीवन जगण्यासाठी सुसंधी प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने व सदर राष्ट्र दिव्यागापासुन मुक्त करण्यासाठी 1993 ते 2002 दशक

दिव्यागतेपासुन मुक्ती दशक म्हणुन राबविल्या जात आहे तप्पुर्वी 1981 मध्ये भारतीय संसदेने दिव्यांगत्वााची सुरक्षितता आणि पुर्नवसन या संबंधिचे विधेयक मंजुर करण्यात आले.हाते. ती संहिता भारत सरकारने ऑगस्ट 1992 मध्ये मान्य केली . या संहिंतेच्या 23 व्या कलमात दिव्यांग मुले समाजाचे अविभाज्य घटक असुन त्यांना सुदृढांप्रमाणेच जगण्याच्या सर्वोत्तम संधी, संवैधानिक हक्काचे संरक्षण आणि सामाजिकएकात्मता या संबंधीचा कायदा संसदेत पारित करण्यात आला या योगे दिव्यांगाना सर्वागिण विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना सामाजिक व कौटंबिक रोषापासुन संवैधानिक रित्या संरक्षण दिल्या गेले.

बाल दिव्यांगाच्या हक्कासंबंधी संयुक्त राष्ट्र संघाने जिनिव्हा येथे दिनांक 11 व 12 जानेवारी 2000 रोजी आंतरराष्ट्रीय बैठक बोलाविली होती या बैठकित मागील मार्गदर्शक साहितांची कलमे सुधारण्यात आली, यामुळे दिव्यांग मुलांचे हक्क व मुलभुत अधिकार अधिक प्रभावितपणे राबविण्यास उत्तेजन मिळाले.

दिव्यांगाच्या हक्कामध्ये त्यांच्या राजकिय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्काच्या समावेशासोबतच त्यांना जीवन जगण्याचा हक्क, विकास, सुरक्षितता, सहभागीत्वाच्या हक्काचा समावेश होतो संयुक्त राष्ट्रसंघाच्या 1988 सालच्या 54 कलमी संहितेला मंजुरी दिलेल्या राष्ट्रांनी आपल्या देशातील प्रत्येक मुलाला वंश लिग धर्म भाषा पालकांची राजकीय मते यासारख्या कोणत्याहि बाबीत भेदभाव न करता उपरोक्त हक्क संबधितानां मिळतील या करिता जागृत राहण्यास सुचविले जाईल यासाठी प्रभवीउपाय योजावेत असे द्वितीय कलमात सुचविले आहे.

### जीवन जगण्याचा व संगोपणाचा हक्क :

उत्तमोत्तम व दर्जेदार जीवनजगण्याचा , स्वताःची ओळख असण्याचा राष्ट्रीयत्वाचा व सर्वोत्म आरोग्य दर्जा मिळविण्याचा हक्क या मुलभुत हक्काचा समावेश जीवन जगण्याच्या हक्कामध्ये होतो सुयोग्य संगोपनाच्या अंतर्गत दिव्यांग मुलांना हालअपेष्ठा सोसावया लागणार नाहीत तसेच त्यांचे शोषण होणार नाही,त्यांच्यावरअत्याचार होणार नाहीत याबाबत सदरहु कायदयाने संरक्षण देण्यात आले आहे. सदर कायदयाचीप्रभविपणे अंमलबजावणी होण्याकरिता आतंरराष्ट्रीय, राष्ट्रीय ते स्थानिक स्तरावर बाल हक्क संरक्षण समिती स्थापन करण्यात आली आहे. आंरराष्ट्रीय समितीची संपुर्ण कार्यवाही संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव करतात. अश्याच प्रकारच्या राष्ट्रीय समित्या संबंधित सदस्य राष्ट्रांनी राष्ट्रीय पातळीवर स्थापन कराव्या असे अपेक्षित आहे. राष्ट्रीय समितीत्यांनी दर 2 वर्षाच्या कालावधीनंतर दिव्यांगाच्या हक्क पुर्तीसाठी राबविलेल्या उपक्रमाचेविस्तृत अहवाल आंतरराष्ट्रीय पातळिवरील समितीकडे पाठविणे अनिवार्य आहे. दिव्याांगाच्या संबधित उपक्रम राबवितांना उदभवणा—या विविध स्वरूपाच्या अडचणीची सोडवणुक करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या संबंधित शाखा याथेचित मार्गदर्शन व मदत करतात.

दिव्यांगाच्या सर्वागिण विकासासाठी भारत सरकारचे मानवसंसांधन विकासमंत्रालय अनेक योजना व उपक्रम राबवित असते, त्यात शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन, व संशोधन या संबंधिच्या योजनामध्ये पुढील बाबी समाविष्ठ होतात दिव्यांग मुले दिव्यांगामूळे नियमित शाळामध्ये शिक्षण घेण्यास असमर्थ ठरतात या अडचणीतुन मार्ग काढण्यासाठी दिव्यांगाना त्यांच्या क्षमतेनुसार शिक्षणाच्या सोई उपलब्ध व्हाव्यात याकरिता विविध प्रकारच्या विशेष शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत यामध्ये अंध, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग, कुष्ठत्वयातील प्रत्येक गटासाठी वेगवेगळया विशेष शाळा आहेत.शैक्षणिक स्वरूपाच्या विशेषसेवा पुरविणे हे या शाळाचे मुख्य प्रयोजन आहे. सदर शाळेमध्ये प्रवेशाचे निकष म्हणजे दिव्यांगत्वाचे अधिकृत प्रमाण पत्र मुलाच्या वयाची मर्यादा 6 ते 18 वर्ष, उत्सर्जन क्रियेसंबधी मुल प्रशिक्षित असावे, मुल स्वतःचलन करीत असावे शिक्षणात अडथडा येईल एवढया वर्तनासंबंधिच्या समस्या तीव्र नसाव्यात.

मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय पातळीवर दिव्यांगासंबंधी शिक्षण, प्रशिक्षण,संशोधन पुनर्वसन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता खालील सहा संस्थाने स्थापन करण्यात आली होती .

- दृष्टीदोष विकलांग राष्ट्रीय संस्थान, देहरादुन, उत्तरांचल
- कर्णबधिर विकलांग राष्ट्रीय संस्था, मुबंई, महाराष्ट्र
- अस्थिव्यंग विकलांग राष्ट्रीय संस्थान, नविन कोलकत्ता, प. बंगाल
- मतिमंद विकलांग राष्ट्रीय संस्थान, सिकंदराबाद, आंध्रप्रदेश
- विकलांग प्रशिक्षण संशोधन पुनर्वसन राष्ट्रीय संस्थान, कटक, ओरिसा
- शारिरीक विकलांग राष्ट्रीय संस्थान, नवीदिल्ली.

या व्यतिरिक्त पुर्व विभाग, पश्चिम विभाग, उत्तर व दक्षिण विभाग अशी चार विभागीय केंद्र अनुक्रमे कोलकत्ता, मुबई, दिल्ली व चेन्नई येथे स्थापण्यात आली दिव्यांगासंबंधिचे कल्याणकारी उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शकाची भुमिका ही केंद्र वठवितात. या व्यतिरिक्त संपुर्ण भारतात 11 जिल्हामध्ये जिल्हा पातळीवरविविध दिव्यांग प्रकारासाठी पुनर्वसन केद्राची स्थापना करण्यात आली स्वंयसेवी संघटनामार्फत संपुर्ण देशभर 2466 शिक्षण प्रशिक्षण, पुनर्वसन केद्रे चालविली जातात यांना मानवसंसाधन विकस मंत्रालयाद्वारे संपुर्ण अनुदान दिले जाते. सदर केद्राचे वर्गिकरण येणे प्रमाणे आहे..

| वर्ग | संख्या |
|---|---|
| मुकबधिर मुलासाठी | 432 |
| दृष्टीदोष असण–यासाठी | 430 |
| कर्णबधिर दिव्यांगासाठी | 728 |
| मतिमंद मुलांसाठी | 681 |
| कुष्ठरोग्यासाठी | 090 |
| सिरेब्रल पाल्सीसाठी | 105 |
| एकुण | 2466 |

## क्रीडा व मनोरंजनासंबंधी सुरक्षितताः

बालकांची खेळण्याची उपजत प्रवृत्ती असते यातुनच त्यांचा सर्वागिण विकास होतो .दुर्दैवाने दिव्यांग मुले सर्व सामान्य मुलांसाठी असणारे खेळ खेळु शकत नाहीत. शारिरीक क्षमतेच्या कमतरतेमुळे ते खेळात मागेपडतात. बरेचदा पालकसुध्दा त्यांना खेळण्याच्या हक्कापासुन वंचित ठेवतात यावर तोडगा काढुन दिव्यांगाच्या क्षमतेनुसार विविध खेळाची नियमावली करण्यासाठी खेळ व क्रीडाचे आयोजन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष ऑलंपिक आंतरराष्ट्रीय संघटना कार्यरत आहे. या संघटनेची स्थापना 1968 साली श्रीमती युसिन केनेडी श्रावर यांनी जोसेफ पी.केनेडी ज्युनियर प्रतिष्ठानच्या सहाकर्याने केली दिव्यांगाकरिता 4 वर्षातुन एकदा विशेष ऑलंपिक आंतरराष्ट्रीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. भारतामध्ये राष्ट्रीय पातळीवर दिव्यांगाकरिता मैदानी स्पर्धाचे आयोजन व प्रशासन विशेष ऑलंपिक इंडियाद्वारे केले जाते याकरीतासदर संस्थान विश्वस्त मंडळ असुन त्यांचे मुख्य कार्यालय बेंगलोर येथे आहे. स्थानिक, जिल्हा विभागीय व राज्यपातळीवर शासकिय क्रीडा संघटना, स्वयसेवी संघटना, पालकसंघ यांचे मार्फतही वेळोवेळी विशेषक्रिडा प्रकाराचे आयोजन केले जाते तद्वतच सदर माध्यमातुन स्वयंरंजनाच्या उपक्रमाचे आयोजन केले जाते यात रंगकाम, गायन, वादन, नुत्य आणि निसर्गभ्रमण यासारख्या विविध छटांचा समावेश असलेली शिबीरे याचा समावेश होतो.

## सामाजिक सुरक्षिततेसंबंधी सुरक्षितताः

पश्चिमात्य विकसित राष्ट्रामध्ये आर्थिक सुबत्तेमुळे, सामाजिक सुरक्षिततेच्या व सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेतुन विकलांगाच्या पालन पोषणाची जबाबदारी शासन स्विकारते त्यासाठी विविध सामाजिक सुरक्षिततेच्या योजना राबविल्या जातात. यामुळे त्यांना जीवनात सामाजिक व आर्थिक स्थिरता लाभते. भारतामध्ये अशा प्रकारच्या कोणतीही सक्षम व्यवस्था दिव्यांगासाठी राबविल्या जात नाही. पालक आपल्या परिने बालवयातील दिव्यांगाच्या पालन पोषणाची जबाबदारी वहन करतात. यापार्श्वभुमीवर दिव्यागांना सामाजिक सुरक्षा मिळावी म्हणुन भारतीय जीवन विमा महामंडळाने जीवनआधर या योजनेची सुरवात 1995 मध्ये केली. आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या दिव्यांगाच्या पालकांना विम्याचे हप्ते भरणेशक्य नसल्यास ते शासन भरते.भारत सरकार तर्फे दिव्यांगाकरिता क्रेडीट कार्ड जारीकरण्यात आले. त्यायोगे स्वतःच्या सिमांत गरजा भागवु शकेल असे गृहित धरण्यात आले. दिव्यांगाच्या शारीरिकअक्षमतामुळे ते घरात व सार्वजनिक स्थळी सहजतेने वावरू शकत नाहीत म्हणुनच घराची व सार्वजनिक स्थळाची रचना करतांना त्यांना सोईस्कर व सहजतेने त्या स्थळांचा वापर करता येईल अश्या पध्दतीने व वास्तुशास्त्रीय दृष्टया उपयुक्त सुविधांची निर्मीती करावी. तसेच प्रवासाच्या शासकीय उपक्रमाच्या वाहनामध्ये दिव्यागांसाठी बैठका आरक्षित असतात .

## बाल दिव्यागांचे भवितव्य व रोजगारसंबंधीची सुरक्षितता :

सर्वसाधारणपणे 18 वर्ष वयापर्यत मुले पालकावर अवलंबुन असतात,यानंतर दिव्यांग स्वताःची जबाबदारी पेलु शकतील यासाठी त्यांना रोजगार प्राप्त होण्याची गरज त्यांना स्वतःला व पालकांना प्रकर्षाने जाणवते या

अपेक्षा पुर्तीसाठी दिव्यांगांना त्यांच्या क्षमतेनुसार विशिष्ठ व्यवसायासाठी प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात यासाठी मागे निर्देशित राष्ट्रीय व स्वंयसेवी संस्थाने व विशेष शाळा मोलाची भुमिका निभवतात त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या प्रशिक्षणच्या माध्यमातुन दिव्यांगाची कार्यक्षमता व सक्रीयता वाढुन उत्पादित वस्तुच्या विक्रीतुन स्वंयरोजगाराच्या माध्यमातुन अथवा नोकरीच्या माध्यमातुन ते स्वतःची उपजिविका करू शकतात. तद्वतच ते अधिक समाजभिमुख होउन उत्कर्ष साधु शकतात त्यांना संरक्षित रोजगार तीन प्रमुख प्रकारे उपलब्ध करून देण्यात येतो. व्यवसाय पुर्व उपक्रम केंद्र संरक्षित कार्यशाळा कामाचे केंद्र विशेष शाळाव्यतिरीक्त इतर विविध शैक्षणिक संस्थानमध्ये पात्रतेनुसार शिकण्यास समर्थ असल्यास त्यांचेसाठी 4ः आरक्षण निर्धारित केले आहे. शासकिय निमशासकीय कार्यालय व उपक्रमामध्ये सुद्वा हेच आरक्षण लागु आहे.

## शासनामार्फत दिल्या जाण—या विविध सवलती मार्फत सुरक्षितताः

दिव्यांगासाठी मोफत शिक्षण,प्रशिक्षण व पुनर्वसन याकरिता शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येते सरकारमान्य शाळा अथवा संस्थेत शिक्षण घेणा—या दिव्यंगाना प्रवासभाडयात 74% सवलत आहे तद्वतच विशेष उपचारासाठी प्रवास करतांना सदर्हु विकलांग व त्याचे मदतनीस यांना75ःभाडयातुनसुट असते. शासन दिव्यागांच्या पाल्यांना प्रत्यक्षपणेआर्थिक मदत करत नाही परंतु अप्रत्यक्षपणे मदत करते. आयकर कायदा 1961 कलम 80 यु प्रमाणे सदर्हु पालकाच्या उत्पन्नातुन वीस हजार पर्यतच्या आयकर रकमेवर आयकर न भरण्याची सुट देण्यात आली आहे सरकारी नोकरीत असणा—या दिव्यांगाच्या पालकांना सदर सुसंधीचा फायदा घेता येईल कुटुंब निवृत्ती योजने अंतर्गत पालकाच्या निधनानंतर सुद्वा दिव्यांगाना निार्धरीत निवृत्ती वेतन दिल्या जाते.अप्रत्यक्षरित्या पुरविल्या जाणा—या या अर्थसहाय्यामुळे दिव्यागांचे प्रशिक्षण व पुनर्वसन सहजतेने करणे पालकांना शक्य होते दिव्यागाना संपर्कसाधने सहजतेने उपलब्ध व्हावीत म्हणुन त्यांना अग्रकमाने दुरध्वनी पुरवठा दिल्या जातो. अंध दिव्यांगांना ब्रेललिपी प्रिट, शैक्षणिक संसाधनासाठी पोस्टाद्वारे सवलत दिली जाते विकलांगासाठी दुरदर्शनवर विविध माहितीपर मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे प्रसारण केले जाते भारताच्या पंचवार्षिक योजनेमध्ये दिव्यांगाच्या विकासात्मक कार्यक्रमावर भारत सरकार एकुण उत्पन्ना पैकी 5ः उत्पन्न खर्च करण्याचे मानव संशोधन विकास मंत्रालयाने निर्धारीत केले आहे

फुलाची एक पाकळी गळुन पडल्यासही आपण त्याला फुलच म्हणतो याच प्रमाणे बालकामध्ये दिव्यगांत्व आले तरीही तो बालकच राहतो. या दिव्यांगाच्या उत्कर्षासाठी शासन विविध योजना उपक्रमांची आखणी करते. परंतु अपु—या क्रियान्वयामुळे त्यांचे मुलभुत हक्क व अधिकार याची गळचेपी होउन ते सर्वागिण विकासापासुन वंचित राहतात. त्यांचेसाठी असलेल्या सर्वागिणविकासाच्या योजनांचा पुर्णपणे लाभ त्यांना मिळावा म्हुणुन समाजातील सृजनशिल व्यक्ती, स्वंयसेवी संघटना यांच्या परस्पर सहकार्यातुन मानव जातीवर लागलेला दिव्यंगात्वाचा काळा डाग पुसन काढण्याची मोठी जबाबदारी आहे. दिव्यंगाना समाजामध्ये अविभक्तपणे सामावुन घेणे हा त्यांचा जन्मसिद्व हक्क आहे .सशक्त बालकांना मिळणारे संवैधानिक कायदेशिर हक्क व अधिकार दिव्यांगाना मिळवुन देणे आद्य कर्तव्य आहे या दानातुनच सुजानव्यक्ती समाजऋणातुन मुक्त होउ शकते या उदात्त हेतुने सर्वस्तरातुन प्रयत्नाची पराकाष्ठा होणे गरजेचे आहे.

## संदर्भ


- **Bajpai p.k (1999)** Flower without one petals still A flower Social Welfare Issue Vol 46 (6) 25-30
- **'Right of the Child '** World Declaration and plan of action from the world summit for children published in India for the Department of Women & Child Development Government of India (1991)
- **Vora R and Sen A,K. (1989)**RehabilitationCenters For The Mentally Retaned Individuals India A Glimpse Research In Psycho Social Issues 13, 156
- www. Apangkarmcharibeed.weebly.com
- https://sjsa.maharashtra.gov.in